नि.दि.दा. क्र. ६७/२०२२
अब्दुल सामाद वि. शेख रोशन
**CNR No.MHWS080008762022**

## <u>निशाणी क्र. २८ खाली आदेश</u>

प्रतिवादी क्र. ०६ ने सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द झालेला विना जवाब दावा आदेश रद्द करुन जवाब दावा अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी केला आहे. त्याच्या कथनानुसार, प्रस्तुत प्रकरण वि. न्यायालयात न्यायप्रविष्ट असून प्रतिवादी क्र. ०६ हे काही आवश्यक माहिती व कागदपत्राअभावी आणि मध्यतंरी प्रतिवादी क्र. ०६ हे आजारी असल्याने मुदतीत लेखी जवाब प्रकरणात दाखल करु शकले नाही. त्यामुळे त्याच्याविरुध्द विना लेखी जवाब आदेश पारीत झाला आहे. त्यामुळे सदर आदेश रद्द होऊन त्याचा लेखी जवाब अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे. याउलट वादीच्या वकीलांनी अर्जास “opposed” असा विरोध दर्शविला आहे.

**<u>०२</u>** दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ०६ ला समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी क्र. ०६ दिनांक १७.०६.२०२२ रोजी प्रकरणात नि.क्र. ०९ नुसार हजर झाला. त्याने नि.क्र. १३ आणि १७ नुसार लेखी जवाब दाखल करण्यास वेळ मिळणेचा अर्ज दाखल केला होता. दिनांक १५.०९.२०२२ रोजी प्रतिवादी क्र. ०६ ने प्रकरण दैनंदीन सुचीवर घेऊन लेखी जवाब दाखल करुन घेण्याची विनंती केली. परंतु ९० दिवसांच्या कालावधीबाबत त्यांना न्यायालयीन पृच्छा करण्यात आली. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०६ ने आजरोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**<u>०३</u>** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ०६ ला दाव्याचे समन्स अगोदरच तामिल झालेले असून प्रतिवादी क्र. ०६ दिनांक १७.०६.२०२२ रोजी प्रकरणात हजर झालेला आहे. त्यामुळे जवाब दावा दाखल करण्याचा ९० दिवसांचा कालावधी अगोदरच निघुन गेलेला आहे. परंतु तांत्रीक बाबींमुळे प्रतिवादींच्या वकीलांनी विना जवाब दावा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे. दिनांक १५.०९.२०२२ रोजीच प्रतिवादी क्र. ०६ ने जवाब दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. ९० दिवसांच्या कालावधीच्या मुद्दांवर दोन्ही पक्षांना ऐकले. नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. ०६ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ०६ चा जवाब दावा अभिलेखावर घेण्यात यावा.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2022.10.06 18:05:38 +0530

( यो.द. कोईनकर)

दिनांकः ०६.१०.२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 06.10.2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 06.10.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 06.10.2022 |